

# वाघ अभियांत्रिकीच्या १५० विद्यार्थ्यांना नोकरी

## ५० कंपन्यांचा प्लेसमेंटमध्ये सहभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या दोन विभागांमधून १५० विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळालेली आहे. यात किमान ४ लाख तर कमाल ८.५ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेजचा समावेश आहे. विद्यार्थ्यांमध्ये ११४ मुले आणि ३६ मुलींचा समावेश आहे.

एबीबी, सुल्झर, बर्न्स अँड मॅकडोनेल्ड, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, महिंद्रा अँड महिंद्रा यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली. तसेच इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखेमध्ये आयटी, कोअर आणि सेवा क्षेत्रातील ५० पेक्षा अधिक कंपन्यांनी या प्लेसमेंट प्रक्रियेत सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांची निवड विविध टप्प्यांत झाली, ज्यामध्ये ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्निकल व वैयक्तिक मुलाखती यांचा समावेश होय. मागील काही वर्षांच्या तुलनेत या शैक्षणिक वर्षांत इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल शाखेतील विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या अधिक संधी उपलब्ध झालेल्या आहेत. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी प्रथम वर्षापासूनच सी. व्ही. रायटिंग, ॲप्टिट्यूड टेस्ट, मॉक टेस्ट व मॉक इंटरव्ह्यू अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थ्यांना प्लेसमेंटबरोबर इंटर्नशिपसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर दुबई व जर्मनी या देशांमध्ये इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून दिली जाते, अशी माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली. विभागप्रमुख डॉ. आर. के. मुंजे, विभागप्रमुख डॉ.पी. बी. कुशारे, प्रा. रूपाली अहिरे, प्रा. एस. एस. सर्वानन, प्रा. भूषण पाटील, प्रा. आर. डी. राखाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.